कौ. हिं. केस क्र. ५२/२०२०
प्रमोदिनी ...वि....संजय
**CNR No. MHAM13001521-2020**

## निशाणी क्र ५ वरील आदेश
## (दि. २८.१०.२०२१)

१. अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम १२, अन्वये अर्ज दाखल केला आहे व कलम २३ (२) नुसार प्रस्तृतच्या अर्जाद्वारे अंतिम निकालपर्यत दरमहा रक्कम रूपये १५,०००/– अंतरिम पोटगीची, दरमहा रक्कम रूपये ३०००/– घरभाडयाचा आदेश मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदाराचा अर्ज निशाणी क्र १, अर्ज निशाणी ५ यांचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदारातर्फे वकीलांचा युक्तीवाद एकला. अभिलेखावर दाखल कागदपत्राचे अवलोकन केले. गैरअर्जदाराने दाखल केलेले निशाणी १२ वरील जबाब वाचला. प्रस्तृत अजाच्या निर्णयासाठी पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमुद कारणाकरीता नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार याने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होत आहे काय? | होकारार्थी |
| २ | अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे दरमहा अंतरीम पोटगी मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| ३ | अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे दरमहा घरभाडे मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र १ करीता**:–

३. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र १ ची लग्नाची पत्नी असुन त्याचे लग्न दि. २१.०३.२०१३ रोजी झाले. लग्नात मिळालेल्या भेटवस्तु व दागदागिने घेउन अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदावयास गेली. लग्नाचे काही महिने गैरअर्जदारांनी अर्जदाराला चांगले वागविले परंतु नंतर गैरअर्जदार क्र २ ते ४ यांचे कानाफुसीवरून गैरअर्जदार क्र १ हे अर्जदार क्र १ ला मारहाण करणे, त्रास देणे व शिवीगाळ, चाारित्र्यावर संशय घेणे, फोनवर नातेवाईकांनी बोलु न देणे सुरू

केले. अर्जदाराला गैरअर्जदार क्र १ कडुन मुलगा नामे भावेश व मुलगी नामे केतकी ही दोन अपत्ये झाली. मुलगी झाल्यापासुन गैरअर्जदार क्र २ व ३ हे अर्जदाराला जास्त त्रास देणे सुरू केले. सन २०१९ मध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराला कोणतेही कारण नसतांना अर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेउन अर्जदाराला घराबाहेर काढुन लाथाबुक्यांनी मारहाण केली व अर्जदाराला गैरअर्जदारांनी अश्लिल भाषेत शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. गैरअर्जदार हे अर्जदाराला तिचे वडीलांकडुन ५०,०००/– रूपये शेतीकामासाठी आणण्यास सांगत होते. गैरअर्जदार क्र १ चा अपघात झाल्यानंतर अर्जदार हि गैरअर्जदारासोबत राहु लागली. तेव्हा सर्व गैरअर्जदारांनी अर्जदाराला शारीरीक व मानसिक त्रास दिला. अशा प्रकारे गैरअर्जदारांनी शारीरीक, मानसिक व आर्थिक कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे अर्जदार क्र १ ते ३ हे अर्जदाराचे माहेरी राहत आहे व त्यांचे दयेवर जगत आहे.

४. गैरअर्जदाराने निशाणी १२ वर आपला जबाब दाखल केला असून अर्जदाराचे संपूर्ण कथन खोटे असल्याचे सांगुन नाकारले आहे. तसेच आपल्या जवाबात असे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदारासोबत राहत असतांना गैरअर्जदारा नेहमी एकेरी आवाजत बोल होती तसेच अर्जदार क्र १ ला पान टपरीवर जाउन खरा खाण्याचा शौक होता. अर्जदाराला याबबात समजाविले असता ती नेहमी गैरअर्जदारा सोबत वाद घालीत होती. अर्जदार ही नेहमी गैरअर्जदाराला व त्याचे कुटुंबाला तुरूंगात टाकेल अशी धमकी देउ लागली. गैरअर्जदाराचा अपघात झाल्यानंतर अर्जदार ही एका इसमासोबत पत्नीसारखी राहु लागली व त्याबाबत अर्जदाराला विचारणा केली असता, तिने गैरअर्जदारांना अश्लील व घाणेरडी शिवीगाळ केली. अर्जदार ही कोणाचेही न ऐकता पंचासमक्ष सप्टेंबर २०२० मध्ये तिचे आणि दोन्ही मुलांचे दागदागिणे व संपूर्ण ऐवज घेउन तिला अर्जदारासोबत राहावयाचे नाही असे दर्शवुन माहेरी निघुन गेली. गैरअर्जदार क्र १ चा अपघात झालेला आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही.

५. अर्जदार व गैरअर्जदार यांनी ऐकमेकांवर आरोपी केलेले आहेत. कौंटुबिक हिंसाचार कायदयाचे कलम २३ अंतर्गत आदेश पारीत करीत असतांना अर्जदाराने गैरअर्जदाराकडुन तिचेवर कौंटुबिक अत्याचार झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट केले पाहिले. याच कासोटीवर, अर्जदाराचे काय म्हणणे आहे हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदाराने अर्जातील मजकुर तसेच कौटुंबिक हिंसाचाराची बाब सिध्द करण्यासाठी गैरअर्जदार हा अर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेतो, तिला तिचे माहेरील लोकांसोबत फोनवर बोलु देत नाही व शिवीगाळ करतो तसेच गैरअर्जदार हे अर्जदाराला शेती कामासाठी माहेरून पैसे आणण्यास सांगतात असे कथन केले आहे.गैरअर्जदाराने अर्जदाराचे चारित्र्यावर घेतलेला संशय हाच मुळात एक प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार आहे. सदर कथानाचे समर्थनार्थ तिने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदार ही आज रोजी माहेरी राहत आहे व ती कौटुंबिक प्रेमापासुन ती दुर राहत आहे ही बाब सुध्दा कौटुंबिक हिंसाचारात समाविष्ट होते. अर्जदाराने अभिलेखावर गैरअर्जदारा विरूध्द दाखल

केलेल्या तक्रारीची प्रत दाखल केली आहे. सदर बाब अर्जदाराचा शारीरीक व मानसीक छळ झाला आहे असे प्रथमदर्शनी सिध्द करते. त्यामुळे प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौंटुबिक छळ केला आहे. करीता मुद्दा क्र १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्र २ करीता**:–

६. अर्जदाराने दरमहा रक्कम रूपये १५,०००/– इतक्या अंतरिम पोटगीची तसेच दरमहा रक्कम रूपये ३०००/– घरभाडयाची मागणी केलेली आहे. गैरअर्जदारांकडे वडीलोपार्जित शेती असून तो मक्त्याने सुध्दा शेती करतो. तसेच गैरअर्जदार हा ट्रॅक्टर चालविण्याचे सुध्दा काम करतो. गैरअर्जदार हा ट्रॅक्टर चालविण्याचे व्यवसायापासुन २५०००/– रूपये महिना सरासरी कमवितो असे अर्जदाराचे कथन आहे. अर्जदाराने तिचे कथनाचे समर्थनार्थ तसेच गैरअर्जदारांचे उत्पनाबाबत गैरअर्जदारांकडे असलेल्या शेतीच्या सातबारा उताराची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. त्यावरून गैरअर्जदारांकडे शेती आहे हे प्रथम दर्शनी स्पष्ट होते. याउलट, गैरअर्जदाराने त्याला कोणतेही ठोस उत्पन्नाचे साधन नाही व अपघातात डावा पाय हा पुर्ण निकामी झाली आहे तो स्वता त्याचे भावावर तसेच आई वडीलांकवर उदरनिर्वाहाकरीता अवलंबुन आहे असे कथन केले आहे. असे असले तरीही, गैरअर्जदाराने त्याला नेमके किती अपंगत्व आले यांचा कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला नाही. अर्जदाराचे पालनपोषणाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. अर्जदाराने केलेल्या कथनावरून गैरअर्जदाराकडे शेती आहे हे प्रथम दर्शनी स्पष्ट झाले आहे. . तसेच गैरअर्जदार याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकरीता काही आर्थिक सहाय केले हे अभिलेखावरून दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराच्या कथनावर अविश्वास दाखविण्याकरीता गैरअर्जदाराने अभिलेखावर काहीही आणले नाही. वरील तथ्थे व परिस्थती लक्षात घेता, गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौंटुबिक छळ/हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी सिध्द केल्याचे दिसून येते. दोन्ही पक्षाचे राहणीमान तसेच वाढती महागाई लक्षात घेता, गैरअर्जदार क्र १ ने अर्जदारास दरमहा रूपये ४०००/– इतकी अंतरिम पोटगी दयावी असा आदेश करणे न्यायाचित होईल. करीता मुद्दा क्र २ चा निष्कर्ष अशंत: होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्र ३ करीता**:–

७. अर्जदार ही गैरअर्जदारापासुन माहेरी वेगळी राहत आहे ही बाब दोघांनाही मान्य आहे. अर्जदाराने तिला घरभाडे म्हणुन ३०००/– रूपये मिळावे असे कथन केले आहे. असे असले तरीही, गैरअर्जदाराने तिचे वर केलेल्या कौंटुबिक हिंसाचारामुळे ती माहेरी राहत आहे हे प्रथम दर्शनी सिध्द झालेले आहे. अर्जदाराने पोलिस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यामुळे अर्जदाराची राहण्याची सोय करणे हे गैरअर्जदाराकडुन अपेक्षित आहे. करीता

गैरअर्जदाराने अर्जदाराचे राहण्याची सोय म्हणुन दरमहा रूपये ५००/– इतके घरभाडे दयावे असा आदेश करणे योग्य होईल. करीता मी मुद्दा क्र ३ चा निष्कर्ष अशंता होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज निशाणी क्र ५ अशंत: मंजुर करण्यात येतो. |
| २ | गैरअर्जदार याने मुळ अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदाराला दरमहा ४०००/– रूपये (चार हजार रूपये) अंतरिम पोटगी मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यत दयावी. |
| ३ | गैरअर्जदार याने मुळ अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदाराला दरमहा रूपये ५००/– (पाचशे रूपये) इतके घरभाडे म्हणुन मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यत दयावे. |
| ४ | गैरअर्जदार याने अर्जदारांशी संपर्क करू नये तसेच कोणत्याही प्रकारचा कौंटुबिक हिंसाचार करू नये. |
| ५ | सदर आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत पुरविण्यात यावी. |

स्वा/–

दि. २८.१०.२०२१

(एन. डी. गोळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र २, धामणगाव रेल्वे